॥ ॐ ॥

मे
२०२२

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

## १३ मे ‘स्व’-रूपवर्धिनीचा वर्धापन दिन




अदम्य आपुल्या आकांक्षाचे गीत आजला गाऊ
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाऊच जाऊ
आम्ही जाऊच जाऊ ।।धृ।।

नवतेजाप्रत नवक्षितिजांच्या दौडत दौडत जाऊ
क्षणभर सांगुनी मनिचे हितगुज स्वप्ने नव रंगवू
नवीन कवने, नव्या कहाण्या नवस्फूर्तीने गाऊ ।।१।।

कधी न रुसणे, ना कधी थकणे, सदा पुढे चालणे
एकचि निश्चय झाला अमुचा राष्ट्र पुन्हा उभविणे
दुर्गमतेची तमा न आम्हा पाऊल पुढेच ठेवू ।।२।।

नसति भाषणे, जीवन ध्येये ही तर अमुची सारी
यत्न शिंपुनी फुलवू क्षेत्रे कर्तृत्वाची न्यारी
इतिहासाची दिशा पालटू, महान मानव घडवू ।।३।।

निश्चय, निष्ठा, नीती यांचे कंकण बांधुनी हाती
व्रतस्थ होऊनि व्यापुनि टाकु विश्वाच्याही मिती
विश्वविजेते हिंदुराष्ट्र ते पुन्हा जगाला दावू ।।४।।

**अशा प्रेरणेने वर्धिनीची**
**वाटचाल चालू आहे.**

# रुग्ण सहाय्यक वर्ग



दि. ४ मे या दिवशी पुणे व माले वर्गाचा शुभेच्छा समारंभ माले येथे झाला. दोन्ही वर्गाच्या शिक्षिका, कार्यकर्ते, टाटा पॉवरचे अधिकारी, सुदर्शन केमिकल कंपनीच्या अधिकारी व राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्थेचे मा. अनिलजी व्यास या कार्यक्रमास उपस्थित होते.

दोन्ही वर्गाच्या मुलींनी मनोगतातून वर्गाच्या अभ्यासाशिवाय शिबिरातून वेगवेगळ्या पण उपयुक्त विषयांवरील व्याख्यानाचा उपयोग होतो आहे, तसेच दवाखान्यातील प्रत्यक्ष कामाच्या अनुभवामुळे कामातील आत्मविश्वास वाढला आहे या गोष्टी सांगितल्या. मा. अनिल व्यास मार्गदर्शन करताना म्हणाले, ‘लहान वयात मिळालेल्या संधीचा तुम्ही निश्चित चांगला उपयोग कराल. वर्गाच्या अभ्यासाबरोबर तुमचे जीवन शिक्षणही चांगल्या पद्धतीने झाले आहे. तुम्ही यापुढील ANM, GNM या शिक्षणाचा जरुर विचार करा.’ सरांनी





मुळशीमधील गावांमध्ये सुरू केलेल्या हिम्मत शाळा, बालवाडी, बचतगट, संस्कारवर्ग या कामाची गरज स्पष्ट केली. पोपटराव पवार, अण्णा हजारे, चैत्राम पवार यांच्या प्रेरणादायी कामाची उदाहरणे देऊन मी माझ्या गावासाठी, समाजासाठी काय करू शकते या विचाराने पुढे जात रहा आणि ते कृतीत आणायचा प्रयत्न करा असे आवाहन त्यांनी केले.

# समुपदेशन विभाग



दि. १२ एप्रिलला सर्व शाखांमधील १० वी - १२ वीतल्या वर्धक-वर्धिकांसाठी कल चाचणी व करियर मार्गदर्शन शिबिर झाले. सुरुवातीला सौ. मेघाताई नगरे यांनी कलचाचणीचे महत्त्व, स्वरूप आणि चाचणीचा होणारा उपयोग वर्धकांना समजावून सांगितला. ‘कल चाचणी’ परीक्षा झाल्यानंतर विविध विषयांवर मार्गदर्शन सत्रे झाली.

* श्रीमती अमिता अंबेकर - करियर कसे निवडावे ?

त्या म्हणाल्या, ‘करियर निवडताना अनेक मार्ग खुणावत असतात. पण आपली क्षमता ओळखून, आपल्या व्यक्तिमत्त्वाला अनुरूप, घाई न करता करियर निवडायचा प्रयत्न करा. आपल्या आवडीच्या छंदात ही आपण करियर करू शकतो. पण त्यात सातत्य ठेवून जिद्दीने पुढे जा.’

▪ श्री. विजय नवले - करियरच्या वाटा

सर म्हणाले, ‘करियर निवडताना आपल्या क्षमतेनुसार त्याचा अभ्यासक्रम, कालावधी, खर्च याचाही विचार करणे आवश्यक आहे. पदवी परीक्षेबरोबर इतर व्यावसायिक अभ्यासक्रम, आय.टी.आय. अभ्यासक्रम, सैनिकी परीक्षा याचाही विचार करायला हवा.’

▪ श्री. हेमंत भुजबळ - व्होकेशनल कोर्सेस.

सरांनी या सत्रात वेगवेगळ्या ९१ व्यावसायिक अभ्यासक्रमांची तसेच सरकारी नोकरीसाठी आवश्यक असणाऱ्या परीक्षांची माहिती दिली. ते म्हणाले, ‘‘आज कुठल्याही क्षेत्रात गेलात तरी आपल्या मातृभाषेबरोबर उत्तम इंग्लिश बोलता आले पाहिजे. त्यासाठी सतत इंग्रजी साहित्य वाचत रहा, ऐकत रहा. कुठलेही काम छोटे किंवा मोठे नसते. त्यातले तुमचे स्वतःचे कौशल्य महत्त्वाचे असते. काही आर्थिक गुंतवणूक न करताही तुमच्या कामातील सेवा, तत्परता या बाबी लक्षात घेऊन इलेक्ट्रिशियन, प्लंबर अशा व्यवसायात तुम्ही यश मिळवू शकता.’’



**यशोगाथा -**

युवा विभागातील अकरावीचा एक विद्यार्थी नैराश्याच्या मनःस्थितीत समुपदेशन विभागाकडे आला होता. ऑनलाईन शिक्षणामुळे अभ्यास नीट झाला नाही व त्यामुळे परीक्षा देण्याचे धाडस होत नाही,

असे तो म्हणत होता. काही सुचत नाही, वर्षही वाया जाते का असे त्याला वाटत होते. परीक्षा सुरू व्हायला अडीच महिने अजून बाकी होते. युवकाशी बोलल्यानंतर त्याच्याबरोबर व पालकांबरोबर संवाद साधण्यात आला. पालकांची व मुलाची दिनचर्या जाणून घेण्यात आली त्यावरून असे लक्षात आले की त्या मुलाला एका विषयाची भीती वाटत होती. त्या विषयासंदर्भात त्याला विशेष मार्गदर्शन करण्यात आले. समुपदेशन, त्याचे उत्तम नियोजन आणि पालकांच्या उत्तम सहकार्यामुळे मुलाच्या विचारांमध्ये बदल झाला आणि नैराश्यातून बाहेर पडून एका नवीन उमेदीने तो परीक्षेची तयारी करू लागला.



# स्पर्धा परीक्षा केंद्र

**शैक्षणिक पालकत्व योजना** - स्पर्धा परीक्षा म्हणजे मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्य या गुणांची कसोटी होय ! अशा अवघड वाटेवर प्रवास करून यशस्वी झालेला अधिकारी नव्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचा प्रवास नक्कीच सुकर करू शकतो. 'पुढच्याच ठेच मागचा शहाणा...' या उक्तीप्रमाणे स्वानुभवातून हे अधिकारी संभाव्य समस्यांचे वेळीच समाधान करू शकतात. केंद्राने फेब्रुवारी २०२२ पासून काही निवडक विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पालकत्व योजना सुरू केली आहे. वर्धिनी परिवारातील यशस्वी प्रशासकीय अधिकारी त्यांना जोडून दिलेल्या उमेदवाराचे/गटाचे शैक्षणिक पालकत्व घेतील. किमान एक वर्ष सर्व परीक्षा होईपर्यंत हे अधिकारी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संवादाद्वारे सतत प्रेरणा देतील. आतापर्यंत दहा अधिकाऱ्यांनी आनंदाने हे पालकत्व स्वीकारले आहे. पुढच्या एक-दोन वर्षात नक्की यशस्वी होतील अशा सोळा होतकरू मुला-मुलींची पाल्य म्हणून त्यांच्याशी सांगड घालून दिली आहे. दर १५ दिवसांनी त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष भेटी, फोन अथवा व्हिडिओ कॉल इ. माध्यमातून संवाद होत राहील. तसेच दर दोन महिन्यांनी सर्व पालक अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आढावा घेण्यात येईल. पुढील वर्षी या उपक्रमाचे सकारात्मक परिणाम नक्कीच दिसतील अशी खात्री आहे.

**Five Points Daily उपक्रम** - MPSC मार्फत दि. २६ फेब्रुवारी रोजी आयोजित संयुक्त गट ब- पूर्व परीक्षेसाठी 'Five Points Daily' हा उपक्रम सुरू करण्यात आला. Telegram या समाज माध्यमाचा प्रभावी वापर करून केंद्राच्या Telegram Channel वर सलग १८ दिवस (दि. ८ फेब्रुवारी ते दि. २५ फेब्रुवारी पर्यंत) दररोज महत्त्वाचे पाच प्रश्न उत्तराच्या पर्यायांसोबत देण्यात आले. या परीक्षेसाठी एकूण ६ विषयाचे प्रत्येकी १५ प्रश्न म्हणजेच सलग तीन दिवस एक विषय घेऊन त्याचे रोज ५ प्रश्न अशा प्रकारे खूप महत्त्वाच्या ९० प्रश्नांची तयारी होण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला. दररोज दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी हे प्रश्न ऑनलाईन सोडवले.

**अभिरुप मुलाखत उपक्रम** - राज्यसेवा परीक्षेच्या मुलाखतींचे वेळापत्रक MPSC आयोगाने जाहीर केल्यानंतर प्रत्यक्ष मुलाखतीपूर्वी तयारी म्हणून उमेदवारांना अभिरुप मुलाखत फार गरजेची वाटते. केंद्रातर्फे दि. ९ आणि दि. १० एप्रिलला अभिरुप मुलाखतींचे आयोजन करण्यात आले. वर्धिनी परिवार आणि इतर जिल्ह्यातील ३७ उमेदवारांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. पुण्याबाहेरील १३ उमेदवारांसाठी खास ऑनलाईन पद्धतीने या मुलाखती घेण्यात आल्या. दि. ९ रोजी दोन ऑनलाईन पॅनल आणि एक प्रत्यक्ष पॅनल तसेच दि. १० रोजी दोन प्रत्यक्ष (ऑफलाईन) पॅनल असे एकूण पाच पॅनल करण्यात आले होते. प्रत्येक पॅनेलमध्ये वेगवेगळ्या विभागांमध्ये कार्यरत असलेले (वर्ग अ आणि वर्ग ब चे) १६ अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक उमेदवाराची मुलाखत घेऊन पॅनेलने वैयक्तिक मार्गदर्शन केले. यामध्ये उमेदवारांच्या जमेच्या बाजू, त्रुटी, कोणत्या गोष्टींवर तयारी केली पाहिजे यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

# वर्धापन दिन विशेष कार्यक्रम



१३ मे 'स्व'-रूपवर्धनीचा वर्धापन दिन सर्व विभागांनी एकत्र येऊन उत्साहात व साधेपणाने साजरा केला. गेली ४३ वर्षापासून समाजातील गरजू, हुशार, वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची ज्ञानगंगा सातत्याने चालू आहे. या कामाची प्रेरणा प्रत्येक कार्यकर्त्यामध्ये अशीच टिकून रहावी असे श्री. शिरीष पटवर्धन सरांनी त्यांच्या मनोगतात

सांगितले. **समर्थ रामकृष्ण शाखेत** विविध गुणदर्शन सादरीकरण (नाटक, मनोरे, डान्स, जादूचे प्रयोग) करण्यात आले. त्यासोबतच माजी शाखाप्रमुख श्री. शैलेश पैलवान यांची मुलाखत आणि मुलांसोबत गप्पा-गोष्टींचा कार्यक्रम संपन्न झाला.



४३ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या वर्धिनीमुळे, कार्यकर्त्यांच्या योगदानामुळे अनेक वर्धक-वर्धिका घडल्या. अशा कार्यकर्त्यांना भेटणे, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे म्हणजेच वर्धिनीविषयी कृतज्ञता व्यक्त करणे. **भगिनी निवेदिता शाखेने** गेली ३५ वर्षे ज्यांनी वर्धिनीच्या कामात स्वतःला झोकून दिले, अशा श्रीमती पुष्पाताई नडे यांच्या घरी भेट दिली. या भेटीत ताईंचे बालपण, महिला विभागाचे काम, बालवाडीची सुरूवात कशी झाली, वर्धिनीची ओळख कशी झाली, वर्धिका म्हणून आपण कसे वागले पाहिजे, त्रिसूत्री का पाळली पाहिजे या विषयांवर चर्चा झाली. काम करत असतानाचे गंमतीशीर अनुभव, काही आव्हानात्मक अनुभव, काम करण्याची प्रेरणा याविषयी मुलींनी त्यांना उत्सुकतेने प्रश्न विचारले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष उपक्रम** - यावर्षी ‘स्व’-रूपवर्धिनीमध्ये १४ एप्रिलला रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. रक्तदानाची सुरुवात ही प्रथम रक्तदात्या मेघा नगरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन




करून केले. उत्थान विभागाच्या, समर्थ रामकृष्ण शाखेच्या आणि भगिनी निवेदिता शाखेच्या युवक आणि युवतींनी डिजिटल माध्यमातून व प्रत्यक्ष संपर्कातून केलेल्या रक्तदानाच्या आवाहनाला पूर्व भागातील नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. ८९ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

स्वामी दयानंद सरस्वती शाखेनेही बिबवेवाडी परिसरात रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबीर यशस्वी केले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. राम बांगड सर (संस्थापक-अध्यक्ष, रक्ताचे नाते चॅरिटेबल ट्रस्ट), तसेच डॉ. अवनी कपाडिया मॅडम (डेंटल होम क्लिनिक), डॉ. नेहा सरोदे मॅडम (द लुक डेंटल क्लिनिक), तसेच भारती हॉस्पिटल रक्तपेढी व्यवस्थापक समिती आदी मान्यवर उपस्थित होते. रक्तदान शिबिरामध्ये ९२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा वसा जपला.

आरोग्य शिबिरामध्ये दंत तपासणी, नेत्र तपासणी व चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, बीपी व शुगर तपासणी,



मशिनद्वारे हाडांची कॅल्शियम तपासणी अशा सर्व गोष्टींची तपासणी व औषधे वाटप करण्यात आले. परिसरातील ४५० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.

**जयंती - ऐक्यासाठी.. बंधुभाव जपण्यासाठी** - शिवराय व भीमराय हे दोन महापुरुष समाज जोडणारे व्यक्तिमत्त्व. त्यांच्या विचारांचा जागर दि. २४ एप्रिल रोजी पारगे चौकात करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि त्यासाठी उद्योग करण्याची प्रेरणा तरुण उद्योजक मैत्रेयी कांबळे हिने मांडली. आपण आपली बुद्धिमत्ता, आपली कौशल्ये योग्य तो पराक्रम करण्यासाठी खर्चिली पाहिजे असे निवृत्त पोलीस अधिकारी भानुप्रताप बर्गे यांनी मांडले. १२ गटांना विधायक कार्य पुरस्कार देण्यात आला. यात गणेशोत्सव मंडळ, बौध्द विहार, शिवजयंती उत्सव समिती यांचा सहभाग होता. ३७५ पेक्षा अधिक नागरिक कार्यक्रमाला उपस्थित होते. परिसरातील ८ मंडळे, रा. स्व. संघ, समर्थ रामकृष्ण शाखा, भगिनी निवेदिता शाखा, उत्थान प्रकल्प या सर्वांच्या युवा कार्यकर्त्यांनी उत्तम समन्वय साधून कार्यक्रम संपन्न केला.



## शाखा विभाग

**प्रश्नमंजुषा** - दि. २० मार्चला इ. ८ वी व ९ वी च्या मुलांची इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, नागरिकशास्त्र या विषयाची प्रश्नमंजुषा घेण्यात आली. तिचा मुख्य उद्देश या विषयांची रुची मुलांमध्ये वाढावी, परीक्षेसाठी तयारी व्हावी व इतिहास, भूगोलासारख्या प्रेरणा आणि सामाजिक शिक्षण देणाऱ्या विषयांचा अभ्यास व्हावा यासाठी ही स्पर्धा घेण्यात आली.

इयत्ता ८ वी - इतिहास - विजेते - राजर्षी शाहू शाखा, उपविजेते - स्वामी दयानंद शाखा

इयत्ता ८ वी - भूगोल - विजेते - धर्मवीर शंभूराजे शाखा, उपविजेते - राजर्षी शाहू शाखा

इयत्ता ९ वी - इतिहास - विजेते - ब्रह्मानंद शाखा आणि सुबोधानंद शाखा, उपविजेते - वर्धिका गट

इयत्ता ९ वी - भूगोल - विजेते - स्वामी दयानंद शाखा, उपविजेते - रामकृष्ण शाखा आणि शंभूराजे शाखा



**भगिनी निवेदिता शाखा -** महाराष्ट्र दिन विशेष - 'तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला' - प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे हे अधिक परिणामकारक असते. एखाद्या कामाचा अनुभव घेतला की त्या कामाची खरी ओळख होते. ज्या परिसरात आपण राहतो तो स्वच्छ ठेवण्याचे काम करतात सफाई कामगार. त्यांना आपण रोज रस्त्यावर झाडू मारताना, कचरा गोळा करताना, घंटा गाडीत कचरा घेऊन जाताना बघतो. पण हे काम नक्की एवढंच असतं का, कामाची रचना कशी असते, किती कष्ट असतात ह्या सगळ्यांचा अनुभव मुलाखतीतून, भेटीतून कळत नाही तर तो त्या कामात उतरून घ्यावा लागतो. म्हणून शाखेने आरोग्य कोठी सोबत कामगार दिनानिमित्त हा अनुभव घेतला.



पुण्यात हद्दी किती आहेत, हा कचरा कसा एकत्र केला जातो, मग तिथून पुढे त्याचे वर्गीकरण, विघटन कसे करतात, घंटागाड्या एका हद्दीत किती असतात, त्याचे नियोजन कसे असते अशा प्रश्नांचे निराकरण अधिकाऱ्यांशी झालेल्या संवादातून मुलींना मिळाले. मुलींनी कचऱ्याच्या घंटागाडी सोबत प्रवास सुद्धा केला. या मिळालेल्या अनुभवातून यापुढे मुली स्वतः रस्त्यावर कचरा टाकणार नाहीत आणि कोणाला टाकूही देणार नाहीत.

**स्वामी श्रद्धानंद शाखा -** स्वामी श्रद्धानंद शाखेने इ. ४ री ते इ. ९ वी तील सर्व मुलांसाठी दि. ५ मे ला बालमेळावा घेतला. वस्तीतील मुलांसाठी विविध स्पर्धा, कार्यशाळा, खेळ, गाणी अशी उपक्रमांची रेलचेल मेळाव्यात होती.



**स्वामी दयानंद सरस्वती शाखा -** दि. २६ एप्रिलला स्वामी दयानंद सरस्वती शाखा आणि लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने अप्पर बिबवेवाडी भागातील एकूण १३ नागरिकांना मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी घेऊन जाण्यात आले. मुलांमध्ये सामजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे आणि सेवाभाव रुजविणे यातून साध्य झाले.



**क्रांतीज्योती सावित्री शाखा -** शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त दि. २५ एप्रिलला मा.बागेश्री पोंक्षे यांनी हिमादास आणि कविता या दोन कर्तबगार मुलींची



माहिती सांगितली. अतिशय बिकट परिस्थितीतही आयुष्य कसे उत्तम घडवता येते हे या दोन्ही उदाहरणांवरून मुलींना समजले. यासोबत आपण आपल्या मुलींना शाखेत का पाठवलं पाहिजे आणि शाखेत आल्याने त्यांच्यामध्ये होणारे बदल या विषयांवर दीदींनी उपस्थित पालकांशी संवाद साधला. पालक वर्धिका युवती व इतर निमंत्रित अशा ६० जणांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला. शाखेत १३ मे ला आँचल माहेश्वरी आणि दिव्याताईंनी मुलींची नृत्य प्रशिक्षण कार्यशाळा घेतली. यात वर्धिका आणि युवती उत्साहाने सहभागी झाल्या.



**धर्मवीर शंभुराजे शाखा -** शाखेने प्रगती पालक मेळाव्याचे आयोजन दि. ७ मे ला केले. मा. श्री. रामभाऊ डिंबळे सरांनी कार्यक्रमाला उपस्थित २९ जणांना प्रगती पालक या योजनेविषयी अत्यंत सुरेख मार्गदर्शन केले. त्यांच्या समृद्ध अनुभवांनी विषयाचे महत्त्व पटवून दिले. सविता सुमंत मॅडम यांनी प्रगती पालक म्हणून जबाबदारी घेतल्यावर आलेल्या अनुभवांचे कथन केले. या मेळाव्यात वकील, मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक, पोलिस, व्यावसायिक असे अनेक अनुभवी लोक उपस्थित होते.

# उत्थान विभाग



**मासिक प्रशिक्षण –** मार्चच्या प्रशिक्षणात त्या महिन्याचा आढावा घेतला व सौ. मुग्धा वाड यांनी DSW वर्गाबद्दल माहिती दिली. त्यानंतर शिक्षण उत्सवाच्या व्यवस्थांचे वाटप करून नियोजन करण्यात आले. विभागाची सहल रायरेश्वरला घेऊन जाण्याचे निश्चित केले. एप्रिलच्या प्रशिक्षणात अभ्यासिका प्रमुखांना नोंदणीसाठी वही देण्यात आली. संदीप मोरे सरांनी 'संघटन' या विषयावर अभ्यासिका प्रमुखांचे खेळ घेतले, तसेच संदीप सर व निलेश सर यांनी मैत्री, प्रेम, आकर्षण या संदर्भात प्रमुखांसोबत चर्चा केली.



**रायरेश्वर सहल –** विभागाची सहल रायरेश्वर येथे नेण्यात आली. आयोजन लष्कर भागाने केले होते. यात लष्कर भाग, म. फुले भाग व कसबा भाग असे मिळून ७८ जण सहलीसाठी आले होते. मुलांनी तेथील इतिहास, आजूबाजूच्या परिसराची माहिती करून घेतली. स्वतःची प्रगती करून घेण्यासाठी मुलांनी रायरेश्वराच्या देवळात रोज अभ्यासिकेत येऊ अशी शपथ घेतली. मुलांची गटशः रचना करून प्रत्येक गटाला वेगवेगळ्या मावळ्यांची नावे देण्यात आली होती. प्रत्येक गटात १५ मुले आणि गटप्रमुख व सहप्रमुख अशी रचना केली होती. सहल खूप आनंददायी होती. मुलांना गड चढण्याचा एक वेगळाच अनुभव मिळाला. काही मुलं पहिल्यांदाच इतक्या लांब आली होती. मुलांना वर्धिनीची सहल ही फक्त फिरण्यासाठी नसून शिकायलाही मिळते हे जाणवले.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती –** 'वाचाल तर वाचाल' या उद्देशाने पुस्तक विक्री अशा विधायक कार्यक्रमाने जयंती साजरी झाली. 'कोणतेही पुस्तक १० रुपयात' हा उपक्रम राबविला. ३५० पुस्तकांची विक्री झाली. या विक्री प्रतिसादातून लोकांना अजूनही वाचनात गोडी आहे हे दिसून आले. अगदी लहान मुलांनी सुद्धा पुस्तके घेतली. स्थानिक रहिवाशांनी या कार्यक्रमास मदत केली. जयंती निमित्त ज्ञानज्योती अभ्यासिकेतील मुलांनी नाटक बसवले होते.

**कसबा समुपदेशन केंद्र –** दि. ७ एप्रिलला कसबा समुपदेशन केंद्राची सुरुवात झाली. आतापर्यंत १६ जणांना वैयक्तिक व १२ जणांना गटाने समुपदेशन करण्यात आले.

**इतर कार्यक्रम –** रंगपंचमीला जल दिन असल्या कारणाने पाण्याचा वापर न करता रंगपंचमी खेळण्याचा आनंद मुलांनी लुटला. World Sparrow Day निमित्त फोनचा जमेल तितका कमी वापर करण्यात आला. कसबा भागात प्रियदर्शिनी अभ्यासिकेत कोरेगाव पार्क व कसबा भाग या दोन्ही भागांचे एकत्रीकरण झाले व निवेदिता शाखेतील प्रांजल भिडे हिने बाजीप्रभूंच्या चरित्राची मांडणी केली. एप्रिल महिन्यात मुलांच्या परीक्षा असल्यामुळे अभ्यासिकेत पाढे पाठांतर, प्रश्न उत्तरांचा सराव व त्यांच्या अभ्यासावर जास्त भर देण्यात आला. महाराणा प्रताप व शिवरत्न अभ्यासिकेतील मुलांना 'शेर शिवराज' हा चित्रपट दाखवला.



# बचत गट



मागील २ महिन्यात बचत गटातील महिलांसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. कागदी पिशव्यांच्या कार्यशाळेत सहभागी ४ महिलांना या माध्यमातून रोजगार मिळाला आणि प्रशिक्षित महिला इतरांना प्रशिक्षण देत आहेत. सौ. कुंदाताई नडे यांनी ऑर्गंडीची फुले तयार करण्यास शिकवले. कर्वेनगर येथील बचत गटाची सहल मुरुड जंजिरा येथे झाली. सहलीचे संपूर्ण नियोजन गटातील महिलांनी केले. काशेवाडी बचत गटात सौ. गौरीताई पेंडसे यांच्या 'मासिक पाळी' व पांडवनगर बचत गटात



सौ. सोनालीताई घाटपांडे यांच्या 'आपले आरोग्य आणि मासिक पाळी' व्याख्यानांनी महिला दिन साजरा झाला. १५ एप्रिलला वर्धिनी परिसरातील बचत गटातील महिलांचे एकत्रीकरण झाले. या कार्यक्रमात श्री. निलेश धायरकर यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलाविषयक कार्य' या विषयावर संवाद साधला. मा. पुष्पाताई नडे यांनी ५ बचत गटांचे एकत्रीकरण आणि त्यावर एक प्रमुख नेमून संघटनात्मक काम






वाढविण्यासाठी प्रयत्न करू असे आवाहन उपस्थित महिलांना केले. याचा परिणाम म्हणून मे महिन्यातील ५ बचत गटांच्या बैठका एकत्रित घेण्यात आल्या.

# पाकोळी बालवाडी



**उन्हाळी निवासी शिबिर -**

यावर्षीचे उन्हाळी शिबिर दि. १२-१३ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. शिबिराचे उद्घाटन अपर्णाताई निरगुडे यांनी केले. अपर्णाताईंनी 'खरा तो एकची धर्म...' ही प्रार्थना मुलांकडून म्हणून घेतली. ताईंनी मुलांना चिमणीची व बकासुराची गोष्ट सांगितली व बकासुराचे गाणे घेतले. मुलांचे गट पाडून प्रत्येक गटाला फुलांची नावे देण्यात आली. सर्व शिक्षकांनी गटाप्रमाणे मुलांना भिंतीवरचे तोरण, रंगीबेरंगी पंखांचे वॉलपीस तयार करण्यास शिकवले. संध्याकाळी मुले पाच वाजता छान ओळीत शिस्तबद्ध पद्धतीने बागेत जाण्यासाठी निघाली. 'एक-दोन-तीन-चार, पाकोळीची मुले हुशार, गणपतीचा जयजयकार, शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देत मुले बागेत पोहचली. भरपूर खेळणी, मज्जा-मस्ती यात दीड तास कसा गेला ते कळलेच नाही. नंतर मुले छान हात पाय धुवून हिरवळीवर गोलाकार बसली. रोजचा परिपाठ, मनाचे श्लोक, बडबड गीते, प्रार्थना, शुभंकरोती इ. मुले छान म्हणत होती. हे झाल्यानंतर मुलांनी भेळीवर ताव मारला. मुलांनी आल्यानंतर हात, पाय धुतले आणि थोडावेळ विश्रांती घेतली. रात्री ओंकार सभागृहामध्ये मुले एकत्र जमली. खिचडी व पापड या जेवणावर ताव मारला.

दुसऱ्या दिवशी मुले लवकर उठली. स्वतःच्या स्वतः सर्व आवरून ओंकार सभागृहात मुलांनी व्यायाम, योगासने केली व काही कवायतीचे प्रकार आणि सूर्यनमस्कार घातले. नाष्टा झाल्यानंतर मुलांच्या विविध मनोरंजनात्मक खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानंतर मुलांकडून कार्डशिटचे ससे बनवून घेतले. जेवणानंतर थोडा वेळ विश्रांती घेऊन मुलांनी 'देवा तुझे किती सुंदर आकाश' या गीताचा सराव केला आणि समारोपासाठी माडगावकर





सभागृहामध्ये मुले एकत्र जमली. प्रमुख पाहुण्या शिल्पाताई पोफळे यांनी मुलांशी व पालकांशी हितगुज साधले. श्री. शिरीष पटवर्धन सरांनी पालकांशी व मुलांशी संवाद साधला. अश्विनीताईंनी दोन दिवसांच्या शिबिराचा छान व्हिडिओ तयार करून पालकांना दाखवला. त्यानंतर पालक व मुलांनी आईस्क्रीमचा आस्वाद घेतला. अशा प्रकारे दोन दिवसाच्या निवासी शिबिराचा समारोप झाला.

दि. १५ एप्रिल पासून सर्व शिक्षिकांनी परिसरातील मंगळवार पेठ वस्ती, P.M.C. कॉलनी, जुना बाजार अशा अनेक ठिकाणी नवीन प्रवेश मिळवण्यासाठी सर्व्हे केला.



# युवा विभाग



वर्धिनीच्या युवा विभागातील महत्वाचा टप्पा निर्माण शाखा. यावर्षी १० वी आणि १२ वी ची परीक्षा दिलेले युवा कार्यकर्ते वर्धिनी विचारांशी जोडले जावेत आणि युवक म्हणून उत्साहाने कामात सहभागी व्हावे म्हणून अनेक भागांनी १० वी - १२ वी संवाद एकत्रीकरणाचा कार्यक्रम घेतला.

दि. ९ व १० रोजी कर्वेनगर व सिंहगड भाग ३ (अ व ब) च्या १० वी व १२ वीतील वर्धकांचे एकत्रीकरण किल्ले सिंहगड येथे करण्यात आलं. पद्य, गप्पा-गोष्टी करत सगळी मंडळी गडावर पोहचली. रात्री निलेश धायरकरांनी 'माझ्या आयुष्यातील मी शिवाजी' हा विषय मुलांसमोर मांडला.



त्यानंतर सहभोजन कार्यक्रम संपन्न झाला. हिंदुत्व, समाजातील अनेक समस्यांवर अनौपचारिक गप्पा झाल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी उपासना व आपण या दोन महिन्याच्या सुट्टीमध्ये कोणत्या नवनवीन गोष्टी शिकणार, कोणत्या पूर्ण करणार याविषयीचा संकल्प कार्यकर्त्यांनी केला. राजे शिवराय प्रतिष्ठानमार्फत शिवाजी खरात सरांनी नरवीर तानाजी मालुसरे मूर्तीचे पूजन केले. त्यानंतर सरांनी युवकांचे वर्धिनीच्या कामातील महत्त्व अधोरेखित केले.

समर्थ रामकृष्ण शाखा, स्वामी योगानंद शाखा, स्वामी श्रद्धानंद शाखेतील युवांचे एकत्रीकरण भावे प्राथमिक शाळेत घेण्यात आले. मैदानी खेळ, चर्चासत्र आणि वैयक्तिक संवाद साधण्यात आला. करियर गप्पा अंतर्गत अविनाश धायरकर (व्यावसायिक), केतन क्यादर (प्राध्यापक) अक्षय गायकवाड अशा वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी १० वी १२ वी गटाशी संवाद साधला. भाग २ चा हा संवाद कार्यक्रम २ व ३ मे ला पार पडला. यामध्ये प्रत्येक युवकाचे पुढील तीन महिन्यांचे वैयक्तिक नियोजन करून घेण्यात आले.



# साथी हाथ बढाना...



श्रेयस आणि विपुल दोघेही बालपणापासूनचे मित्र आणि सध्या १ वर्षापासून विवेकानंद शाखेचे शिक्षक!

काल शाखेत विपुलचा वाढदिवस शाखेच्या पद्धतीने, मुलांच्या घोळक्यात साजरा झाला. श्रेयसच्या ओळखीतून विपुल शाखेत शिक्षक म्हणून रुजू झाला. समाजासाठी काहीतरी करून दाखवण्याची त्याची धडपड कायम सुरू असते. वर्षभरापूर्वी शाखेत शिक्षकांची आवश्यकता होती तेव्हा श्रेयसने शिकवण्यासाठी लगेच होकार दिला. स्वतःचा लॅपटॉप मुलांना हाताळायला देण्यापासून ते अद्यावत असणारे तंत्रज्ञान वापरून श्रेयस मुलांना शिकवत असतो. काही महिन्यांपूर्वी शाखेत गणित विषयासाठी शिक्षकाची आवश्यकता होती. ही गोष्ट श्रेयसच्या बालमित्राला म्हणजे विपुलला समजली आणि त्याने देखील शाखेत शिक्षक म्हणून शिकवायला सुरुवात केली आणि तो अजूनही येत आहे. शाखेच्या सहली, कार्यक्रम वा इतर काहीही असो, ते दोघेही आवडीने सहभाग घेतात. अशी **स्वयंप्रेरित युवा पिढी कामाचा उत्साह वाढवते.**

# सुखद अनुभव



मी रामकृष्ण शाखेचा शाखा प्रमुख असताना एक उपक्रम घेतला होता, तो असा की, आपण होळीच्या दिवशी होळीला नैवेद्य दाखवतो. पण तो नैवेद्य होळीमध्ये जाऊन त्याची राख होते. पण शाखेत असताना आम्ही जागोजागी होळीच्या ठिकाणी जाऊन होळीत जाणारे नैवेद्य गोळा करू लागलो आणि तेच सगळे अन्न आम्ही पुणे स्टेशन जवळील फुटपाथवर राहणाऱ्या लोकांना देऊन येत होतो. हे आम्ही करत असताना आमच्या भागातील आजी म्हणजे आमच्या नानु आजीही आमच्या उपक्रमात सामील झाल्या. पुढच्या वर्षीही आम्ही ते चालूच ठेवले पण काही काळाने आम्हाला ते करता आले नाही. पण नानु आजी प्रत्येक वेळी मला घरी बोलवायला येतात आणि नैवद्य आणून देतात. आपण केलेला एखादा उपक्रम किती परिणामकारक असतो याचा मला अनुभव आला.

**- अक्षय भेगडे**

# आम्ही बी घडलो...

राजे शिवराय प्रतिष्ठानच्या नरवीर तानाजी मालुसरे यांच्या दैनंदिन पूजन करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सेवेकरी मेळावा झाला. यामध्ये कार्यक्रम Facebook वर Live करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली होती, म्हणून कार्यक्रमाला वेळेपूर्वी पोहचलो. साऊंड, माईक या तांत्रिक गोष्टींची तपासणी चालू असताना शिवा सरांनी मला बोलावलं आणि 'मनोगत करशील का' असं विचारलं? माझ्या चेहऱ्यावर प्रश्नार्थक मुद्रा पाहिल्यावर त्यांनी लगेच 'अरे आपलाच कार्यक्रम आहे, खूप जण नाहीयेत. करशील तू...' असं सांगितल्यावर त्यांना नाही म्हणण्याचे धाडस मला काही झालं नाही. प्रत्यक्ष कार्यक्रम सुरू झाला तेव्हा मी बोलू शकेन का याचीच शंका मनात दाटून आली. इतक्यात माझी नजर स्टेजवरच्या ज्ञापुंच्या तसबिरीकडे गेली. त्यांची ती प्रसन्न मुद्रा आणि जणू माझ्याकडेच बघून स्मित हास्य करत "करशील रे तू..." असा आग्रह त्यात जाणवला. आणि आणि मग काय, माझं नाव पुकारल्यानंतर पुढील दोनच मिनिटे मी बोललो. अडखळलो नाही, विषयांतर झाले नाही. अपेक्षित व मुद्देसूद मनोगत झालं. कार्यक्रम झाल्यानंतर सर्वांनी कौतुक केलं. मी मात्र करू शकलो ज्ञापुंच्या प्रोत्साहनामुळे आणि आग्रहामुळे. खरंतर छत्रपती शिवराय, शंभूराजे, नरवीर तानाजी मालुसरे, सूर्याजी, बाजीप्रभू, मुरारबाजी, येसाजी कंक, शिवा काशिद, जिवा महाला, इतकेच नव्हे तर भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील असंख्य क्रांतिकारक आमच्यासमोर गोष्टीरूपात उभे केले ते ज्ञापुंनीच. आज ते सोबत असल्याचा अनुभव पुन्हा एकदा आला.

**- अक्षय मुळे**

# श्रद्धांजली

- समर्थ रामकृष्ण शाखेचे युवक श्री. अक्षय भेगडे यांच्या वडिलांचे श्री. गोरख (आप्पा) भेगडे यांचे दुःखद निधन झाले.
- वर्धिनीचे देणगीदार श्री. यशवंत पटवर्धन यांचे दुःखद निधन झाले.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**